नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज


संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - २ रे<br>Year - 2nd | अंक - २०६<br>Issue - 206 | वार शुक्रवार दि. १३ डिसेंबर २०२४<br>Blow- Friday Date 13 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## डी गुकेश विश्वविजेता! भारताच्या बुद्धिबळपटूने घडवला इतिहास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेश विश्वविजेता ठरला आहे. दोम्माराजू गुकेश ने १८व्या वर्षी विश्वविजेता होण्याचा बहुमान पटकावला. १८वर्षीय गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेत जगज्जेता डिंग लिरेनचं आव्हान मोडून काढत इतिहास घडवला.


आतापर्यंतच्या १३ डावांपैकी ३२वर्षीय लिरेनने पहिला डाव जिंकला होता. त्यानंतर गुकेशने तिसरा डाव जिंकून बरोबरी साधली. त्यानंतर दोन्ही ग्रँडम स्टर्सनी सलग सात डाव बरोबरीत सोडवले होते. ११व्या डावात गुकेशने विजय मिळवून बरोबरीची कोंडी सोडवली. १२व्या डावात लिरेनने बाजी मारली. अखेरचा डाव कोण जिंकणार की हा मुकाबला टायब्रेकरमध्ये जाणार याकडे बुद्धिबळ चाहत्यांचं लक्ष होतं. गुकेशने दमदार खेळ करत विश्वविजेता होण्याचा मान पटकावला. सगळ्यात लहान वयाचा विश्वविजेता होण्याचा विक्रम आता गुकेशच्या नावावर नोंदला गेला आहे. लिरेनच्या हातून झालेल्या घोडचुकीनंतर गुकेश विश्वविजेता होणार असल्याचं स्पष्ट झालं आणि त्याच्या डोळ्यात विजयाश्रू तरळले. गुरूवार, १२ डिसेंबर रोजी सिंगापूर येथे झालेल्या जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप साम न्याच्या १४व्या निर्णायक सामन्यात डिंग लिरेनचा पराभव करून सर्वात गुकेश विश्वविजेता ठरला. गुकेश हा विश्वनाथन आनंदनंतर विश्वविजेता ठरणार दुसरा भारतीय ठरला. गुकेश आणि डिंग यांनी गुरुवारी सामन्याच्या अंतिम डावात प्रत्येकी ६.५ गुणांसह बरोबरी साधली. १४व्या डावात, ज्यात डिंग पांढऱ्या सोंगट्यासह खेळत होता, तो सामन्याच्या ५३व्या चालीत डिंगने चूक होईपर्यंत अनिर्णित दिशेने वाटचाल केली होती. गुकेशने खेळत राहत डिंगवर दबाव आणणं सुरू ठेवलं आणि यात गतवर्षीचा विश्वविजेता लिरेन फसला. लिरेन आणि गुकेश यांच्यातील अंतिम डावातील सामना ही ड्रॉ होण्याच्या मार्गावर होता पण डिंगच्या हातून मोठी घोडचूक घडली आणि त्याच्या हातातून सामना निसटला. डी गुकेश या ऐतिहासिक विजयानंतर म्हणाला, सामन्यात जेव्हा मला कळलं की लिरेनने घोडचूक केली आहे, तो माझ्या जीवनातील खूप आनंदाचा क्षण होता. आपल्या सर्वांनाच माहितीय की लिरेन उत्कृष्ट खेळाडू आहे. तो बुद्धिबळच्या इतिहासातील एक उत्कृष्ट खेळाडू राहिला आहे.

# केंद्रीय मंत्रिमंडळाची 'एक देश, एक निवडणूक' विधेयकाला मंजुरी

## पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली देशात 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर आज (दि. १२ डिसेंबर) केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे.



एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी म ोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास 'एक देश, एक निवडणूक' धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये 'एक देश, एक निवडणुकी'च्या आश्वासनाचा समावेश होता. शिवाय, 'रालोआ ३.०' सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण सामील करण्यात आले होते. सरकारने मंगळव- ारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती. 'रालोआ' सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल (संयुक्त) आणि तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच पाठिंबा दिला आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदा- वते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे. 'एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशा- ला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे', असे मत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संप्टेबर महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

## एनआयएचे ८ राज्यांमध्ये १९ ठिकाणी छापे; राज्यातील अमरावती, संभाजी नगर व भिवंडीचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईः राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) आठ राज्यांमधील विविध ठिकाणी गुरूवारी छापे टाकले. त्यात राज्यातील अमरा- वती, संभाजी नगर व भिवंडी येथील ठिकाणांचा समावेश आहे. जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधीत संशयितांच्या ठिकाणांवर छापे टाकण्यात आले आहेत. राज्यात या कारवाईदरम्यान तीन संशयितांना ताब्यात घेऊन एनआयएने त्यांची चौकशी केली.

जम्मू आणि काश्मिर, आसाम, महाराष्ट्र, गुजरात व उत्तर प्रदेश या चार राज्यांमधील सुमारे १९ ठिकाणी एनअ- ारएने एकाच वेळी छापे टाकून शोध मोहिम राबवली. जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंध असलेलया संशयावरून एआयएने संबंधीत ठिकाणी छापे टाकले. राज्यातील अमरावती, संभाजी नगर व भिवंडी येथेही विविध ठकाणी एनआयएने छाप टाकले. त्यात अमरावती व संभाजी नगर यथून प्रत्येकी एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले. त्याशिवाय ठाणे जिल्हयातील भिवंडीम धूनही ४५ वर्षीय व्यक्तीला संशयावरून ताब्यात घेऊन त्याची चौकशी करण्यात आली. या संशयितांचे दहशतव- ादी संघटना जैश ए मोहम्मदशी संबंध असल्याचा एनआयएला संशय आहे.

### जैश ए मोहम्मद दहशतवादी संघटनेशी संबधाच्या संशयावरून छापे

एनआयएने गुरूवारी पहाटेपासूनच देशभरात कारवाईला सुरूवात केली होती.

जैश ए मोहम्मद या दहशतवादी संघटनेद्वारे देशभरात तरूणांची माथी भडकवण्याचा प्रकार सुरू होता. त्या अनुषंगाने काही संशयीतांविरोधातही कारवाई करण्यात आली. यावेळी संशयीत दस्तावेज व संगणक उपकरणेही एनआयएन जप्त केली आहेत. नेमक्या कोणत्या घातपाती कारवायांसाठी जैश ए मोहम्मद दहशतवादी संघटना तरूणांना संघटनेत सामील करून घेत होती याबाबत एनआयए तपास करत आहे. दोन महिन्यांपूर्वीच एनआयएने पाच राज्यांमधील २६ ठिकाणी छापे टाकले होते. या कारवाईत शेख सुल्तान सलाहउद्दीन अयुब ऊर्फ अयुबी याला अटक करण्यात आले होते.

## मंदिर-मशिदींविरोधात आता दाखल होणार नाहीत नवे खटले, सर्वोच्च न्यायालयाने दिले महत्त्वपूर्ण निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशात सध्या विविध धर्मांच्या प्रार्थनास्थळांविरोधात दाखल होत असलेल्या खटल्यांदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्व सत्र न्यायालयांना महत्त्वाचे आदेश दिले आहेत. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने, जोपर्यंत प्रार्थनास्थळ कायदा १९९१ च्या वैधतेशी संबंधीत याचिका निकाली निघत नाहीत तोपर्यंत कोणत्याही न्यायालयाने धार्मिक स्थळे किंवा तीर्थक्षेत्रांच्या संदर्भात कोणताही नवीन खटाला दाखल करुन घेऊ नये असे निर्देश दिले आहे. याचबरोबर या प्रकरणांशी संबंधीत कोणताही आदेश देण्यास किंवा सर्वेक्षण करण्याची परव- ानगी देण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे.

दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने १९९१ च्या प्रार्थनास्थळ कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर उत्तर दाखल करण्यासाठी केंद्र सरकारला आणखी चार आठवड्यांचा वेळ दिला आहे. भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना, न्यायमूर्ती न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती केव्ही विश्वना- थन यांच्या खंडपीठाने म्हटले की, हे प्रकरण या न्यायालयासम ोर न्यायप्रविष्ट असल्याने, नवीन दावे नोंदवले जाणार नाहीत किंवा कारवाईचे आदेश दिले जाणार नाहीत, असे निर्देश देणे आम्हाला योग्य वाटते. प्रलंबित खटल्यांमध्ये न्यायालय कोणतेही अंतरिम आदेश किंवा अंतिम आदेश देणार नाहीत.

देशातील विविध हिंदू संघटनांनी आणि नागरिकांनी अनेक मंदिरांवर मशिदी बांधल्याचे दावे करत १९९१ च्या प्रार्थनास्थळ कायद्याच्या विरोधात याचिका दाखल केल्या आहेत.

## सोलापूरमध्ये एम्स रुग्णालय उभा करा, राज्य सरकार मदत करेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर/प्रतिनिधी : खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूरच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सोलापूरमध्ये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान (एम्स) उभारण्यासाठी त्यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांना पत्र पाठवून मागणी केली आहे. प्रणिती शिंदे या खासदार झाल्यापासून सोलापूरच्या विविध विकास प्रकल्पांवर सातत्याने लक्ष केंद्रित करत आहेत. ज्यात विम ानतळ विकास, रेल्वे सुविधांचा विस्तार, युवकांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांचा विज, पाणी, हमीभाव या सारख्या प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी दिल्ली दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे. त्याचप्रमाणे आता त्यांनी सोलापूरसाठी एम्सची मागणी केली आहे.

### खासदार प्रणिती शिंदे यांचे केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र

खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्रीय आरोग्य मंत्री नड्डा यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सोलापूरची भौगोलिक स्थिती आणि लोकसंख्या पाहता सोलापूर जिल्ह्यासह आजूबाजूच्या जिल्ह्या- तील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळणे गरजेचे आहे. यासाठी सोलापूरमध्ये एम्ससारख्या अद्ययावत रुग्णालयाची आवश्यकता आहे. सोल- ापूर हा पश्चिम महाराष्ट्रातील शैक्षणिक , औद्योगिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या एक महत्त्वाचा जिल्हा म ानला जातो. सोलापूर शहरात लोकसंख्येची घनता अधिक आहे. शिवाय ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे विविध आजारांवर उपचार करण्यासाठी नागरिकांना शहरात धाव घ्यावी लागते. या पार्श्वभूमीवरत सोलापूरमध्ये एम्सची स्थापना होणे एक गरजेची बाब असून त्याचा लाखो रुग्णांना फायदा होणार असल्याचे शिंदे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

आरोग्य सेवांच्या उभारणीसाठी एम्ससारख्या अत्याधुनिक रुग्णालयाची आवश्यकता असल्यामुळे शिंदे यांनी संसदेत सोलापूरसाठी ही मागणी उपस्थित केली आहे. सोलापूरच्या आरोग्य व्यवस्थेची सुधारणा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उच्च दर्जाचे उपचार उपलब्ध होण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे.तसेच महाराष्ट्र सरकारने सोलापूरमध्ये एम्स उभे राहण्यासाठी मदत करण्यास तयार आहे. त्यामुळे सोलापूर हे एम्स प्रकल्पासाठी योग्य ठिकाण ठरेल, असेही शिंदे यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान, मागील दहा वर्षांत सोलापूरचे विकास कामे बऱ्याच प्रमाणात रखडले होती. भाजपच्या खासदारांकडून सोलापूरच्या विकासासाठी फारसे प्रयत्न झाले नाहीत, असा आरोप होत आहे. मात्र, प्रणिती शिंदे यांनी खासदारपद मिळाल्यापासून सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या पाठपुराव्यामुळे सोलापूरच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. त्याप्रमाणेच एम्स रुग्णालयाच्या खासदार शिंदे यांनी केलेल्या मागणीवर केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, अशी अपेक्षा सोलापूरकरांनी व्यक्त केली आहे.

### लाभार्थींच्या अर्जाची पडताळणी होणार?

### थेट पत्रकात काढले

# लाडकी बहीण योजनेची निकष बदलले ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुख्यमंत्री म ाजी लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी माहितीसाठी गेम चेंज करणे. लोकसभेत महायुतीला आराध्यात मोठे अपयश पहावे लागले. हो- ते परंतु त्यानंतर राज्यातील माहिती सरकारने राज्यातील महिलांना थेट आर्थिक लाभ देणारे योजना आणली व माहिती मधील नेत्यांनी या योजनेचे या त्या मार्फत माहिती सरकारला जोरदार प्रचार केला गेला राज्याच्या विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी तब्बल २३५ जागा जिंकल्या.



विरोधकांनाही लाडकी बहीण योजनेचा निकालानंतर परिणाम झाले की मान्य केले महायुतीला पुन्हा सत्ता मि ळवून देण्यात मोलाची मदत करणाऱ्या या योजनेतील काही लाभार्थ्यांना मात्र आता लाभापासून वंचित राहावं लागू शकत अशी चर्चा समाज माध्यमांवर पाहायला मिळत आहे पण या योजनेचे निकष आता बदललेले जातील, वो लाडकी बहीण मि ळतील लाभार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करून लाखो लाभार्थी महिलांचे अर्ज बाद होतील असे दावे केले जात आहे. याबाबत राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाला सातत्याने विचार न होत आहे तसेच माझी महिला व बालकल्याण मंत्री अधिक तटकरे यांना या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे अखेर राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाने या योजनेबाबत पसरत असलेल्या फोनच्या खंडन केले आहे.

राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाने या योजनेबाबत लोकांमध्ये पसरलेली संभ्रम दूर करणार हे पत्रक जारी केले आहे. आमदार अदिती तटकरे यांनी हे पत्र समाज माध्यमांवर शहर केले आहे व या पत्रकाचे तटकरे यांनी एक सवय एक गोष्ट केली आहे या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की मुख्यमंत्री माजी लाडके बहिणी या योजनेबद्दल विल्स व व्हिडिओच्या म ाध्यमातून दिशाभूल करणारी माहिती सम ाज माध्यमांवर प्रसाद करण्यात येत आहे मुख्यमंत्री माझे लाडके बहीण योजना लागू झाले झाल्यापासून आतापर्यंत योजनेच्या निकषांमध्ये कोणताही बदल झालेला नाही, एकही महिला लोकप्रतिनिधी म्हणून यावर मी स्वतः जातीने लक्ष ठेवून आहे. तरी याबाबत समाज माध्यमातून होणाऱ्या अपप्रचारास कोणीही बळी पडू नये ही नम्र विनंती.

**महिला व बालकल्याण विभागाने जरी केलेल्या पत्रकात काय म्हटले?**

महिला व बालकल्याण विभागाने जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे की सर्वांना कळविण्यात येते की राज्याच्या महिला व बालकल्याण विभागाच्या असे निदर्शनास आलेले आहे की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण येणे बाबत समाज माध्यमान रील्स व व्हिडिओद्वारे वेगळी माहिती प्रसारित करण्यात येत आहे त्याम ुळे लाभार्थी महिला तसेच जनतेच्या म नात गैरसमज निर्माण होत असून याबाबत वेगवेगळ्या स्तरावरून या कार्यालयाकडे विचारणा होत आहे.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या अटी व शर्तीमध्ये तसेच योजनेच्या सद्यस्थितीमधील कार्यपद्धतीम ध्ये कोणताही बदल झालेला नाही व या योजनेमध्ये कोणत्याही बदल असल्यास प्रशासनाकडून आपणास कळविण्यात येईल. तसेच महिला व बालकल्याण विभागाची वेगवेगळ्या शासकीय यंत्रणा सुचवले आहे की त्यांनी लोकांमधील संभ्रम दूर करावा सदर योजने संदर्भात चुकीच्या बातम्यामुळे लाभार्थी व जनतेच्या मनात कोणत्याही गैरसमज निर्माण होऊ नये याकरिता आपण आपल्या स्तरावरून तसेच अंगणवाडी सेविकामार्फत या योजनेची सद्यस्थिती लाभार्थी व जनतेच्या निदर्शनास आणून द्यावी.

## संपादकीय....

### एक देश एक निवडणूक

देशात 'एक देश, एक निवडणूक' हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिति नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर दि. १२ डिसेंबर केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर केले जाण्याची शक्यता आहे. एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास 'एक देश, एक निवडणूक' धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदावते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे. 'एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे.

## टाकळीवाडीत अज्ञात व्यक्तीने पेटवला उसाचा फड; चार लाखांचे नुकसान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी प्रतिनिधी/नामदेव निर्मळे :

टाकळीवाडी तालुका शिरोळ हे असं गाव आहे की या गावाला नदी नाही. ८० टक्के मुरमाड शेती. त्यामुळे बोर, विहीर,यांना पाणी कमी असते. रात्रीचा दिवस करून शेतकरी आपल्या पिकाला पाणी देत असतात. यातच मोठा फटका या शेतकऱ्यांना बसलेला आहे.

येथील गट क्रमांक ४५४ या शेतामध्ये दिनांक ११/१२/ २०२४ रोजी सुमारे रात्री ११.०० सुमारास अज्ञात व्यक्तीने ऊस फड पेटवला. यामध्ये ४ एकर ऊस जळून खाक झालेला आहे.शेतकऱ्याचे ४ लाखाचे नुकसान झाले. तात्काळ श्री गुरुदत्त शुगर लि. टाकळीवाडी येथील अग्निशमन दलाला पाचारण करून आग आटोक्यात आणण्यात आली. तलाठी राहुल सनदी, सिद्धा भमाणे, कोतवाल संजय कोळी यांनी ऊस पिकाचा पंचनामा केला. यामध्ये शेतकरी रावसो भमाणे या शेतकऱ्याचा ९० हजार किमतीचा ठिबक सिंचन जळून खाक झाला. शेतकरी गोपी भंडारे, सुभाष बिरणगे, शेतकरी पुंडलिक निर्मळे मंगल निर्मळे या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. आपला ऊस जळालेला पाहून तसेच नुकसान झालेले पाहून अनेक शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आले.

## जिल्हा क्रीडा पुरस्कार २०२३-२४ साठी ३० डिसेंबर पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जि.मा.का) : जिल्हयातील उत्कृष्ट क्रीडा व खेळाडू व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक यांच्या क्रीडा क्षेत्रातील योगदानाचे मुल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा व प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने जिल्हा क्रीडा पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांनी ३० डिसेंबर २०२४ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत असे, आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

या क्रिडा पुरस्कारासाठी सर्वेत्कृष्ट गुणवंत खेळाडू (पुरुष-१, महिला-१, दिव्यांग खेळाडू-१ ), गुणवंत क्रीडा मार्गदर्शक (०१) असे पुरस्कार दिले जातात.सदर पुरस्कारासाठी दिनांक ०१ जुलै ते ३० जून या कालावधीसाठी मागील खेळाडूसाठी पाच वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल तसेच क्रीडा मार्गदर्शकासाठी दहा वर्षाची कामगिरी विचारात घेतली जाईल.

जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या अर्जदाराचे जिल्हयात किमान १५ वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. क्रिडा मार्गदर्शक म्हणून १० वर्ष क्रिडा मार्गदर्शनाचे कार्य केले असले पाहिजे व त्यांनी वयाची ३५ वर्षे पुर्ण केलेली असणे आवश्यक आहे. खेळाडूने पुरस्कार वर्षासह लगतपूर्व ५ वर्षापैकी २ वर्ष त्या जिल्ह्याचे मान्यताप्राप्त खेळाच्या अधिकृत खेळांमध्ये प्रतिनिधित्व केले असले पाहिजे.

क्रीडा मार्गदर्शकासाठी गेल्या दहा वर्षात किमान वरिष्ठ गटातील राज्य व राष्ट्रीय पदक विजेते तसेच कनिष्ठ शालेय, ग्रामीण व महिला (खेलो इंडिया) मधील राष्ट्रीय स्तरापर्यंतचे पदक विजेते खेळाडू तयार केले असतील असे क्रीडा मार्गदर्शक अर्ज करण्यास पात्र राहतील. सांघिक अथवा वैयक्तिक मान्यताप्राप्त क्रीडा प्रकारात नॅशनल गेम्स, वरीष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत प्रतिनिधीत्व केलेला खेळाडू अथवा राज्य व जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम तीन क्रमांकापर्यंत यश मिळविणारे किमान तीन खेळाडू घडविणारा मार्गदर्शक विहीत नमुन्यातील अर्ज संघटनेमार्फत अथवा वैयक्तिकरित्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

क्रिडा पुरस्कारासाठी परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे दि.३० डिसेंबर २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याशी संपर्क साधावा असे, आवाहनही जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. पवार यांनी केले आहे.

## दत्त जयंती निमित्त नूसिंहवाडीत जय्यत तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरोळ/ संजय चव्हाण : तालुका शिरोळ येथील श्री क्षेत्र नूसिंहवाडीत येत्या शनिवारी होणाऱ्या दत्त जयंती सोहळ्यानिमित्त ग्रामपंचायत प्रशासनाचे युद्ध पातळीवर तयारी सुरू केली असून. बहुमजली पार्किंग शिवाय आणि चार ठिकाणी वाहन पार्किंगची व्यवस्था करण्याचे नियोजन केले. असल्याची माहिती सरपंच चित्रा सुतार. माजी सरपंच धनाजीराव जगदाळे उपसरपंच रमेश मोरे यांनी दिली.




श्री क्षेत्र नृसिंहवाडी येते १४ डिसेंबर रोजी दत्त जन्मकाळ सोहळा साजरा होत आहे. यानिमित्त श्री चीमासाहेब जगदाळे कॉलेज पटांगणावर (औरवाड फाट्याजवळ ) नरसिंहवाडी जल शुद्धीकरण केंद्र संभाजी नगर और वाड नवीन पुलाजवळ माहेश्वरी मंगल कार्यालय मागील बाजू मोरे प्लॉट बाहुबली पार्किंग दक्षिण बाजू. स्वागत कमानी जवळ पाटील महाराज मठ नवीन इमारत पाठीमागे वाहने तसेच सरकारी दवाखाना बाजू माहेश्वरी कार्यालय पूर्व बाजू .दक्षिण बाजू .येथे दुचाकी वाहने पार्किंग व्यवस्था करण्यात आले आहे. त्याचबरोबर स्वागत कमान मंदिर मार्गावर होणारी वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी सरकारी दवाखान्यापर्यंत शिरोळ पोलीस ठाण्याच्या मदतीने रस्ता दुभाजक बसवण्यात आले आहेत.

शनिवारी दत्त जयंतीदिनी गावातून जाणारे अनेक मार्ग वाहतुकीसाठी ग्रामपंचायत मार्फत बंद केले आहेत. दरम्यान वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी सरपंच .चित्र सुतार .माजी सरपंच धनाजीराव जगदाळे .उपसरपंच रमेश मोरे .ग्रामपंचायतीचे अधिकारी एस.पी .कांबळे ग्रामपंचायत सदस्य विद्या .कांबळे मंगल खोत. अनदा पुजारी. पूनम जाधव .चेतन गवळी. तानाजी निकम .अमोल विभुते .यांच्यासह कर्मचारी नियोजन करण्यात गुंतले आहेत.

## सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे ॲक्शन मोडवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : आज देऊळगाव राजा नगरपरिषद प्रेक्षागृह येथे

**नागरीकांना सुविधा द्या, सर्वच विभाच्या अधिकाऱ्यांना सक्तिचे आदेश**

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघातील सर्व शासकीय अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक आमदार मनोजभाऊ कायंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी मतदार संघातील प्रशासकीय कामांचा व शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला. तसेच मतदारसंघातील सद्यस्थितीत चालू कामे व भविष्यातील निधी तरतूदी बाबत माहिती घेतली. सर्वच विभागांना कामाच्या गुणवत्तेला प्राधान्य देत नागरिकांना जास्तीत जास्त सुविधा देण्याच्या सूचना मा.आमदार महोदयांनी दिल्या,कामातून सुसंस्कृत मातृतीर्थ घडवण्याचा मानस मा.आ.मनोज कायंदे यांनी व्यक्त केला. यावेळी मतदारसंघातील सर्व कायदा व सुव्यवस्थेची देखील पोलीस प्रशासनाकडून माहिती जाणून घेतली. आमदार कायंदे यांनी नागरिकांच्यासुरक्षिततेच्यासंदर्भात विविध उपाययोजना करण्याच्या




सूचना संबंधित विभागास दिल्या व मतदारसंघातील अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिले. याप्रसंगी विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रमाता जिजाऊ नारीशक्ती राज्यस्तरीय पुरस्काराने डॉ. सुमय्या शेख होणार सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : अनेक वर्षा पासून वैद्यकीय क्षेत्रात काम करत असताना.उसतोड कामगार , मजुर, गोरगरीबांना दिवसभर रूग्नाची सेवा करत असताना रात्री अपरात्री महिला असतांनाही. जिवाची पर्वा न करता पाच गोल्डमेडलिस्ट असणार्या. डॉं सुमय्या यांच्या कार्याची दखल घेत यांना राष्ट्रमाता जिजाऊ नारीशक्ती राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण येत्या ३० डिसेंबर रोजी सा खेर्डा येथे होणार असल्याने परिसरात त्यांच्यावर आनंदाचा वर्षाव होत आहे.



प्रसिद्धी पत्रकानव्ये कळविण्यात आले की , दै. भारत संग्राम व स्व. मधुकर खंडारे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ व सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त तसेच समाजभूषण अर्जुन गवई यांच्या वाढदिवसानिमित्त साखरखेर्डा येथे राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामध्ये उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट वृत्तकथा, उत्कृष्ट समाज कार्य स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृती लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या पुरस्कारांसाठी वैद्यकीय क्षेत्रातील अनेक वर्षांची कामगिरी, त्यांची सामाजिक बांधिलकी, जाणिवांच्या जागृतीसाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि आज पर्यत त्यांची कामगिरी हे पाहुण डॉ.सुमय्या यांना राष्ट्रमाता जिजाऊ नारीशक्ती राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येत आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार येत्या ३० डिसेंबर रोजी सा खेर्डा येथे मान्यवराच्या हस्ते बहाल करण्यात येणार असल्याचे समाज भूषण अर्जुन गवई तथा , दै. भारत संग्राम चे जिल्हा प्रतिनिधी सचिन खंडारे यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

या पुरस्कारामुळे जिल्ह्यातील सर्व वैद्यकीय क्षेत्रातील सहकारी तथा लोकप्रतिनिधी, व गावाकरी मित्र मंडळामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून डॉ सुमय्या यांच्या च्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त लोहा तालुक्याच्या वतीने लोहा तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध मागण्यांचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी : दिनांक १० डिसेंबर जागतिक मानवी हक्क दिनानिमित्ताने लोहा तालुक्याच्या वतीने तहसील कार्यालय मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांना निवेदन देण्यात आले. दिनांक १० डिसेंबर जगभरात आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिवस म्हणून साजरा केला जातो. संयुक्त महाराष्ट्रात मानव अधिकार दिवस कार्यालयाच्या नेतृत्वात हा दिवस साजरा करीत असताना समाजातील स्वातंत्र्य व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित राहावे तसेच या व्यक्तीला सन्मानपूर्वक जगता यावं यासाठी जगातील मानवी हक्कांचा सरनामा तयार करण्यात आला. या सरनाम्यावर भारताचे पहिले प्रधानमंत्री आपल्या आपल्या देशातील प्रत्येक नागरिकांना सरनाम्या प्रमाणे हक्क प्रदान करण्याचे अभिवचन देऊन स्वाक्षरी केले. आज देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. देशाने अनेक क्षेत्रात प्रगती




केली तळागळातील वंचित घटक हा सरनाम्या पासून कोसो दूर आहे.भारतीय संविधानाच्या उद्देशिकेत दिलेल्या मूल्य प्रत्येक घटकांना मिळावे म्हणून मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय संस्थापक मा.कर्मवीर एकनाथराव आव्हाड साहेब यांच्या नेतृत्वात दिनांक १० डिसेंबर १९९० रोजी मानवी हक्क अभियानाची स्थापना होऊन आजपर्यंत वंचित घटकांना न्याय मिळावे म्हणून कार्यरत आहे. आज मानवी हक्क अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड साहे अनेक राज्यात अभियान कार्यरत आहे. आज जागतिक मानवी हक्क दिन साजरा करीत असताना खालील मागण्यांचे निवेदनात प्रमुख मागण्या माजी मुख्यमंत्री माननीय एकनाथरावजी शिंदे साहेबांनी घोषणा केल्याप्रमाणे शासकीय जमिनीवरील धारकांना त्यांच्या नावे बिनाआठ ७/१२ देण्यात यावे. गायरान जमिनीवर गायरान धारकांच्या वहीत क्षेत्रातील चालू असलेला सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम त्वरित थांबविण्यात यावे. महाराष्ट्रात दलित बजेटच्या कायदा मंजूर करण्यात यावा. बँड वादक कलावंतांना दरमहा पाच हजार रुपये पेन्शन देण्यात यावे. सरकारी गायरान जमिनीवरील घरांसाठी झालेले अतिक्रमण नियमित करण्यात यावे.

दिनांक १० डिसेंबर रोजी जागतिक मानवी हक्क दिनानिमित्ताने निवेदन देताना उपस्थित. मानवी हक्क तालुकाध्यक्ष तुकाराम नारायण दाढेल, भुजंग वाघमारे, तुकाराम वाघमारे,लक्ष्मण गायकवाड, म ेकाले साहेब,अदी उपस्थित होते.

## गोरगरीब जनतेला रेशन धान्य मिळवण्यासाठी युवा काँग्रेस शहराध्यक्ष संदीप शिंदे आक्रमक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर शहरातील व तालुक्यातील गोरगरीब सर्व सामान्य लोकांना अन्नसुरक्षितेतील धान्य लोकांना मिळत नाही याबाबत वारंवार तक्रार करून देखील सर्वसामान्य नागरिकांची दखल घेतली जात नाही. पंढरपूर शहरातील मोठ्या नामांकित लोकांना धान्य मिळते परंतु सर्वसामान्य अत्यंत गरीब या लोकांना धान्यापासून वंचित राहावे लागत आहे.

वारंवार पाठपुरा करून

**पंढरपूरच्या तहसीलदारांनी दिले आश्वासन**

देखील याची दखल घेतली जात नाही या सर्व गोष्टींच्या गांभीर्यपूर्वक विचार करावा आणि सर्वसामान्य लोकांसाठी न्याय देण्याचे प्रयत्न करावा अशी मागणी पंढरपूर शहरी व काँग्रेसचे शहराध्यक्ष संदीप शिंदे यांच्या वतीने पंढरपूरची तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

यावेळी युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष सोमनाथ आरे काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी, सेवा दल शहराध्यक्ष गणेश माने, युवक शहर उपाध्यक्ष रवी अग्रवाल, उपाध्यक्ष संग्राम मुळे, सोशल

**पंढरपूरच्या तहसीलदाराची आश्वासन ज्या नागरिकांचे नाव ऑनलाईन नाही ते करण्यात येईल. नागरिकांना शासनाकडून दिला जाणारा रेशन देण्यात येईल. धान्य देत नाही त्या रेशन धान्य दुकानदारावर कारवाई करण्यात येईल. अशी आश्वासन पंढरपूरची तहसीलदार सचिन लंगोटे यांनी दिले.**

मीडिया शहराध्यक्ष महेश आदटराव, जिल्हा सरचिटणीस पांडुरंग डांगे, एकनाथ माने, किसान सेल तालुका अध्यक्ष अक्षय शेळके, वरिष्ठ उपाध्यक्ष आनंद सोमासे, आधी जण उपस्थित होते.

या निवेदनात असे म्हटले आहे की ऑनलाईन रजिस्टर म** ज्यादा असून प्रत्यक्षात लाभार्थींना म** कमी दिला जातो कोणतेही मशीनवर जाणून मोजून धान्याची पावती दिली जात नाही अन्य धान्य मोफत असताना सुद्धा लाभार्थी कडून पैसे घेतले जातात या सर्व गोष्टींची दखल घेण्यात यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा युवक काँग्रेस शहर व तालुका तीव्र आंदोलन करेल असा इशारा शहराध्यक्ष संदीप शिंदे यांनी दिला आहे.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सर्वसामान्य नागरिकांपर्यंत योजना पोहोचविण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय करणार नाही : आ आवताडे

## दर महिन्याला प्रत्येक विभागाची स्वतंत्र बैठक घेऊन आढावा घेतला जाईल : आ आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दुसऱ्यांदा आमदार पदी विराजमान झाल्यानंतर आमदार समाधान आवताडे यांनी मंगळवेढा तालुक्यातील प्रशासनाची पहिली आढावा बैठक घेत अधिकाऱ्यांनी गतिमान प्रशासन चालवण्यासाठी प्रामाणिकपणे काम करावे, शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून शेवटच्या घटकापर्यंत शासकीय योजनेचा लाभ द्या या कामात हलगर्जीपणा दिसून आला तर मी कुणाचीही गय करणार नाही. जे ठेकेदार टेंडर घेऊन काम न करता बसले आहेत त्यांना तात्काळ काळ्या यादीत टाका अशी तंबी प्रशासनास देत यापुढे दर महिन्याला प्रत्येक विभागाची स्वतंत्र बैठक घेऊन आढावा घेतला जाईल, कामात हलगर्जीपणा खपवून घेणार नाही अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

मंगळवेढा येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये प्रशासनातील सर्व खात्याच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती यावेळी आमदार आवताडे बोलत होते या बैठकीला माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, प्रांतअधिकारी बी आर माळी, तहसीलदार मदन जाधव, गटविकास अधिकारी योगेश कदम, जिल्हा दूध संघाचे संचालक औदुंबर वाडदेकर,माजी सभापती तानाजी काकडे,माजी उपसभापती सुरेश ढोणे,रामेश्वर मासाळ,



माऊली कोंडुभैरी,प्रकाश गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

या आढावा बैठकीमध्ये आमदार समाधान आवताडे यांनी प्रत्येक विभागाच्या खाते प्रमुखांकडून त्या त्या विभागातील कामाचा आढावा घेतला योजनेच्या अंमलबजावणी मध्ये आपल्याला काही अडचणी येतात का?,इतर काही साधनसामुग्रीची कमतरता आहे का?काम करण्यास तुमच्या काही अडचणी आहेत का ? याची सविस्तर माहिती घेण्यात आली यावेळी पंचायत समिती बांधकाम खात्याकडे निविदा स्तर कामे किती? पूर्ण किती? अपूर्ण किती? सुरू न झालेली किती याची माहिती घेऊन ज्या ठेकेदाराने टेंडर घेऊन सहा महिने काम सुरू केले नाही त्या ठेकेदारांना आजच्या आज नोटिसा काढून ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याचा सूचना देण्यात आल्या,कृषी विभागाला विम्यामध्ये बोगसगिरी होत असून बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या.ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने येणाऱ्या काळात टंचाई जाणवण्याची शक्यता असून त्यांचा आराखडे तात्काळ तयार करून पिण्याच्या पाण्याची गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या त्याचबरोबर काही ठिकाणी जलजीवनच्या कामांमध्ये निकृष्ट कामे झाल्याच्या तक्रारी आहेत अशा कामांना मी स्वतः भेटी देणार असल्याचेही आमदार अवताडे यांनी सांगितले.एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागाने लेक लाडकी आणि अंतर्गत २५२ लाभार्थ्यांना लाभ

तर लाडकी बहीण अंतर्गत ५४२५७ लाभार्थ्यांना लाभ दिल्याचे सांगितले. पशुसंवर्धन विभागाअंतर्गत जनावरांची जनगणना होत असून प्रत्येकाच्या घरी जाऊन अचूकपणे जनगणना करण्याच्या सूचना देण्यात आल्या, शिक्षण व आरोग्य विभागाकडून अनेक पदे रिक्त असून ती पदे तात्काळ भरण्यासाठी आपण प्रयत्न करावेत अशी मागणी आमदार अवताडे यांच्याकडे केली तर मंगळवेढा तालुक्यामध्ये १०८ नंबर वर अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी २ अंबुलन्स उपलब्ध आहेत यातील भोसे येथील अंबुलन्स सुरू असून मंगळवेढा येथील म्बुलन्स ला डॉक्टर नसल्याने अपघात असताना मदत करण्यासाठी ही गाडी जात नाही त्या ठिकाणी तात्काळ डॉक्टरची भरती करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

पंचायत समिती अंतर्गत विविध योजनांसाठी ग्रामपंचायत च्या ग्रामसभा ठरावाची आवश्यकता असते अनेक गावांमध्ये ग्रामसेवक हे ग्रामसभा घेत नसून काही ठराविक लोकांची नावे घालून बोगस ठराव देत आहेत याला आळा घाला अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल अशा सूचना गट विकास अधिकारी योगेश कदम यांना आमदार अवताडे यांनी दिल्या

नगरपालिकेच्या कामकाजाचा आढावा घेत असताना अनेकांनी नगरपालिकेच्या कारभाराविषयी तक्रारी केल्या

गटारी तुंबल्या आहेत साथीचे रोग वाढत आहेत एका कुटुंबात अनेक घरकुले दिली आहेत मुख्याधिकारी कसलेही लक्ष घालत नाहीत अशी तक्रार एका नागरिकांने केली असता आमदार अवताडे यांनी तुम्हाला मंगळवेढ्याचे काम झेपत नसेल तर जागा मोकळी करा जबाबदार अधिकारी काम करण्यासाठी येईल असे म्हणत आठ दिवसात कामकाजात सुधारणा करा अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल अशी तंबी मुख्याधिकाऱ्यांना दिली.

भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचे बिल हे कोटीच्या घरात गेले असून शिखर समितीला ही योजना चालवणे शक्य नसून

शिखर समिती रद्द करून ही योजना शासनाकडे हस्तांतर करा अशी मागणी यावेळी करण्यात आली याचबरोबर महावितरण विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असून मी मंजूर करून आणलेले ट्रांसफार्मर हे ठेकेदार आम्ही मंजूर करून आणतो असे सांगून शेतकऱ्यांकडून पैसे लुबाडत आहेत यावर संबंधित महावितरणच्या अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे अन्यथा मला माझ्या पद्धतीने तुमच्यावर लक्ष द्यावे लागेल असा इसारा महावितरण विभागाला देत जर कोणत्या शेतकऱ्याकडून पैशाची मागणी केली तर गाठ माझ्याशी आहे असा सज्जड दम महावितरण अधिकाऱ्यांना दिला याचबरोबर म्हैसाळ योजना भूमी अभिलेख सहाय्यक निबंधक आगार व्यवस्थापन क्रीडा अधिकारी राज्य उत्पादन शुल्क अन्न औषध प्रशासन भूजल सर्वेक्षण वनविभाग महसूल विभाग आदी विभागांचा आढावा घेत कामात गतिमानता आणा मी अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा प्रत्येक विभागाची स्वतंत्र आढावा बैठक लावून दर महिन्याला कामात किती सुधारणा झाली हे पाहणार आहे व कामात कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालणार नाही असा इशारा आ आवताडे यांनी बैठकीप्रसंगी दिला.

## थोडक्यात...

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मोठा धक्का

पंढरपूर : मुख्यमंत्री पद सोडल्यानंतर एकनाथ शिंदे यांना पहिला मोठा धक्का बसला. शिंदेंचे अत्यंत विश्वासू अशी ओळख असलेले मंगेश चिवटे यांच्याकडून मुख्यमंत्री



वैद्यकीय सहायता निधी विभागाच्या प्रमुख पद काढून घेण्यात आले. व त्यांच्या जागी डॉ. रामेश्वर नाईक यांची नियुक्ती करण्यात आली.

चिवटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून राज्य पाण्यातील गरीब गरजू रुग्णांना मोठी मदत केली. परिणामी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ची प्रतिमा सुधारली होती मात्र आता चिवटे शेवटी अण्णा पदावरून हटवून नाईक यांची नियुक्तीने पत्र मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी यांनी जारी केली आहे. नाईक यांच्याकडे यापूर्वी उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची जबाबदारी होती. शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांची जनसामान्यांचा नेता म्हणून प्रतिमा निर्माण करण्यात मुख्यमंत्री सहायता निधी विभागाचा मोठा वाटा होता शिंदेंनी मुख्यमंत्री सहायता निधीतून अनेक गरजू रुग्णांवर मोफत उपचार केले.चिवटे यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याची सराटे येथील मनोज जारंगे पाटील यांच्या उपोषणाच्या वेळी चिवटे यांनी मध्यस्थीची भूमिका बजावली होती व शिंदे यांचे निरोप घेऊन चिवटे अनेकदा जरांगे यांच्याकडे जायचे. जरांगे यांनी उपोषण मागे घेण्यासाठी ज्या वाटाघाटी झाल्या होत्या. त्यात चिवटेचा सहभाग होता. मात्र आता त्यांच्याकडून मुख्यमंत्री सहायता निधी विभागाचे पद काढून घेण्यात आले आहे व शिंदे यांच्यासाठी हा मोठा धक्का असलेली चर्चा आहे.

# लातुर जिल्ह्यातील घारोळा येथे चंपाषष्टी महोत्सव साजरा



### खंडोबा भक्त प्रल्हाद वाघमारे यांनी ओढल्या बारा बैलगाड्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/अमर जाधव : गेल्या दहा वर्षापासुन घारोळा येथे चंपाषष्ठी महोत्सव साजरा केला जातो दरवर्षी प्रमाने याही वर्षी चंपाषष्ठी महोत्सवानित्त घारोळा गावातील भक्त प्रल्हाद वाघमारे हे गेली एकेवीस दीवसापासुन एकच फळ खाउन उपवास धरतात व चंपाषष्ठी दिवशी असंख्य वारु घारोळा गावामध्ये प्रती जेजुरी प्रमाने वसार्या खेळत भंडार्याची उधळन करतात ,खंडोबा भक्त प्रल्हाद यांना भंडार्याची उधळन करत आंघोळ घातली जाते त्यानंतर मंदिरा प्रदक्षणा घालुन परंपरागत चालु असलेला गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न होतो ,घारोळाच नव्हे तर संबंध महाराष्ट्र भरातील भाविक घारोळा गावी येउन मनोभावे खंडोबाचे दर्शन घेतात गाड्या ओढण्याचा आनंद भाविक घेतात ,घारोळा गावातील रस्ते भाविकांनी व भंडार्यांनी फुलुन गेले होते ,व भाविकांसाठी सुंदर व रुचकर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते ,यावेळी

सरपंच सत्यभामा आशोक चिंते,डीगंबर सुर्यवंशी ,भक्त प्रल्हाद वाघमारे गोवर्धन सुर्यवंशी ,आत्माराम शिंदे कल्यानराव शिंदे ,आनंदराव शिंदे,शिवाजी शिंदे ,कीसनराव जाधव ,विठ्ठल सुर्यवंशी नागोराव पाटील चेअरमन प्रदिप जाधव ,पोलीस पाटील गंगाधर बनसोडे,रज्जाक शेख,उमाकांत बुके,नरसींग पाटील ,शरद जाधव ,मनोज उळागड्डे,जनार्दन सुर्यवंशी गोपाळ सुर्यवंशी ,बालाजी सुर्यवंशी शिवलाल वाघमारे ,चंद्रकांत जाधव ,चंद्रकांत वाघमारे नागनाथ बनसोडे,वसंत उळागड्डे गोवींद कनामे ,माधव कनामे ,

मनोहर कोरे ,बंडु शिंदे ,हनमंत मोहीते ,प्रदिप माळी उमर शेख.गोविंद सुर्यवंशी ,चंद्रकांतु जाधव ,ज्ञानेश्वर तौरे ,विनोद जाधव ,सह घारोळा ग्रामस्थ व पंचक्रोशीतील वारु व भाविक उपस्थीत होते

# मविप्र सांस्कृतिक महोत्सवात निफाड महाविद्यालय अग्रेसर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मविप्र सांस्कृतिक महोत्सव २०२४ अंतर्गत संस्थेतील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ आणि वाव देण्यासाठी तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजन, के आर टी हायस्कूल मौजे सुकेने या केंद्रावर करण्यात आले. यात एकूण ०९ शाखांच्या संघांनी सहभाग नोंदविला असून यामधे निफाड महाविद्यालयातील संघाने घवघवीत यश संपादन केले असून, 'समूह नृत्य' कला प्रकारात कु. प्रज्ञा तांबे व ग्रुप यांनी प्रथम



क्रमांकाचे पारितोषिक तर 'वैयक्तिक गीत गायन' या कला प्रकारात कु. आदित्य बर्वे या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

त्यामुळे या दोन्ही संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. या स्पर्धेत कू. श्रृती काळे,विशाखा गांगुर्डे,नेहा म्हैसधूने,कल्याणी ढोमसे, सृष्टी निकाळे, प्रांजल हांडोरे,कविता ताती,ऋतुजा बेंद्रे,प्रज्ञा तांबे,मानसी सोनवणे,दीक्षा उगले, आदित्य बर्वे हे सहभागी झाले या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मनीषा कोटकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल म.वि.प्र. समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, संचालक शिवाजी आप्पा गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई बोरस्ते, निफाड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.(डॉ.)सुरेशजी जाधव, प्रा.अभय वडघुले, डॉ. प्रवीण ढेपले आणि सर्व प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# वैशाली माडे फाउंडेशन तर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पडघा/प्रतिनिधी : शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी, ग्रामीण भागात आदिवासी विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यासाठी वैशाली माडे फाउंडेशन तर्फे भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद आनंदनगर बोरिवली आदिवासीपाडा शाळेत आणि जि.प.तळवली मराठी शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी सुप्रसिध्द गायिका वैशाली माडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला . आणि गाणे गाऊन विद्यार्थ्यांना बोलके करत शिक्षणाची जनजागृती केली. यावेळी वैशाली माडे फाउंडेशनच्या वतीने वाटप केलेल्या शैक्षणिक साहित्यात दप्तर, वही, पेन्सिल, तर आदी वस्तूचा समावेश होता. यावेळी सुप्रसिद्ध गायिका वैशाली माडे, माधव वाघमारे, शिरीष पवार, श्वेता पवार ,

तळवली, अर्जुनली ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंच उषा कदम , कमलेश जाधव, मिलिंद जाधव,सागर भोईर, पंकज भोईर, मुख्याध्यापक प्रकाश सोनावणे, सहशिक्षक कल्पेश जाधव तर आदी उपस्थित होते.




माळेगाव यात्रेच्या तयारीसाठी जिल्हा परिषद प्रशासन सज्ज

आमदार प्रताप पाटील चिखलीकरांनी सर्व विभागांचा घेतला आढावा

# माळेगाव यात्रेतील भाविकांना सर्व सोयी-सुविधा मिळण्याच्या दृष्टीने यंत्रणांनी नियोजन करावे : आमदार प्रताप पाटील चिखलीकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा प्रतिनिधी/शिवहार गालफाडे

नांदेड जिल्ह्यासह आपल्या शेजारील राज्य व जिल्ह्यातील अनेक भाविक दर्शनासाठी माळेगाव येथे दरवर्षी येतात. दक्षिण भारतातील माळेगाव येथे सर्वात मोठी यात्रा दरवर्षी भरते. असंख्य लोकांचे माळेगाव येथील श्री खंडोबा कुलदैवत असून येथील जत्रा ही मागील अनेक वर्षांपासून भक्तांचे श्रद्धास्थान आहे. यात्रेत येणाऱ्या प्रत्येक भाविकांला सर्व सोयी-सुविधा प्राप्त होतील यादृष्टीने संबंधित यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करावे , असे प्रतिपादन आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले. माळेगाव येथे आमदार प्रताप पाटील चिखलीकराच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक संपन्न झाली यावेळी ते बोलत होते.

श्री क्षेत्र माळेगाव येथील यात्रेच्या पूर्वतयारीसाठी स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेवून नियोजनाच्या दृष्टीने आज माळेगाव येथे आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, माळेगावचे सरपंच हनमंत धुळगंडे, प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी




अधिकारी मंजूषा कापसे, पशुवैद्यकिय विभागाचे उपायुक्त डॉ. घुले व वरिष्ठ अधिकारी व माध्यम प्रतिनिधी तसेच मोठया प्रमाणात ग्रामस्थांची उपस्थिती होती. यात्रेच्या परंपरेप्रमाणे येथील पशुप्रदर्शन, शंकरपट याकडे भाविकांचा अधिक ओढा आहे यासाठी जिल्हा परिषद प्रशासनामार्फत यांचे आयोजन करण्यात येणार आहे. पशुधनाच्या व कृषि विभागाच्या विविध स्टॉलसह विविध स्पर्धाही आयोजित करण्यात येणार आहेत.

यात्रेत सीसीटीव्ही, फिरते शौचालय, सुरक्षा व्यवस्था, शालेय मुलांसाठी माळेगाव येथे सहलीचे आयोजन करण्यात यावे, वाहन व्यवस्था तसेच माध्यम प्रतिनिधींसाठी वाहन व्यवस्था करण्यात यावी याबाबत आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी प्रशासनाला सूचना दिल्या. यात्रेसाठी आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले.

यात्रेतील भाविकांसह सर्वांना पिण्याचे पाणी, बाजारात विकल्या जाणाऱ्या अन्न पदार्थांची तपासणी करण्याबाबत अन्न व औषध पुरवठा विभागाला सूचना दिल्या.

यात्रेतील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षतेच्यादृष्टिने सीसीटीव्ही लावले जाणार आहेत. यात्रेतील सामाजिक सलोखा, शांतता याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. यात्रेत कोणतेही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, पोलीस विभाग दक्ष आहे. याचबरोबर माळेगावच्या ग्रामस्थही अधिक दक्षता घेवून प्रशासनाला सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. २९ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध महोत्सव व उपक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी महावितरण, पाणी पुरवठा, राज्य परिवहन महामंडळ, शिक्षण विभाग, बीएसएनएल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अन्न व औषध प्रशासन, राज्य उत्पादन शुल्क, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, आरोग्य विभाग, पोलीस प्रशासन, पशुसंवर्धन विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, समाज कल्याण, महिला व बालविकास विभाग, बांधकाम विभाग आदी विभागांनी करावयाच्या कार्यवाहीचा आढावा यावेळी घेण्यात आला.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### कमल बिराजदार यांचे निधन



अक्कलकोट : स्व. कमल इरण्णा बिराजदार वय ७५ यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्या एस एस शेळके प्रशाला, वागदरी येथील सहशिक्षक प्रशांत इरण्णा बिराजदार यांच्या मातोश्री तसेच सिद्धेश्वर कल्याणशेट्टी व मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या मोठ्या भगिनी व त्यांच्या पश्चात १ मुलगा, ४ मुली, सून, जावई व नातवंड असे परिवार आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी व अक्कलकोट नगरपालिकाचे माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी व हन्नूरचे उपसरपंच सागर कल्याणशेट्टी यांची आत्या होते.

### दुचाकीला चारचाकी वाहनाची धडक; दोघे गंभीर जखमी

सोलापूर : शगुप्ता दाल चावल येथे दुचाकी (क्रमांक एम.एच.१३.बी.एल.७३४८) वरून बिगारी भुजंग जावीर यांना घेऊन नाश्ता करण्यासाठी रस्ता क्रॉस करून जाताना क्रुझर (क्रमांक केए.२५.सी ८९१३) भरधाव वाहनाने वेगाने हयगयीने चालवून दुचाकीला धडक देऊन दोघांना गंभीर जखमी केले.याप्रकरणी नरसिंग ईराप्पा श्रावणी (वय-६०, रा.चांदतारा मज्जिद जवळ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून राजशेखर सिद्धप तेली (वय-५२, रा.चडचण) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोह. चव्हाण हे करीत आहेत.

# असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या नवीन नोंदणीसाठी सर्वांनी सामाजिक बांधिलकी ठेवून काम करावे

## कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा यासाठी सर्व ठेकेदारांनी त्यांच्याकडील कामगारांची संख्या व माहिती त्वरित प्रशासनाला द्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : कामगार विभाग अंतर्गत कामगाराच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे असंघटित क्षेत्रातील कामगारांची नवीन नोंदणी करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी प्रमुखांनी त्यांच्या विभागाची कामे करणाऱ्या ठेकेदाराच्या तालुका निहाय बैठका घेऊन त्यांच्याकडून कामगारांची संख्या व त्यांची माहिती घ्यावी. जेणेकरून अशा कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देणे सुलभ होणार आहे. सर्व संबंधित विभागांनी सामाजिक बांधिलकी ठेवून या कामाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचे नोंदणी करण्याच्या अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत इशाधीन शेळकंदे, सहायक कामगार आयुक्त श्री. गायकवाड, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे कामगार म्हणून नोंदणीसाठी कामगारांना संबंधित ठेकेदाराकडून ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र आवश्यक**

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्ह्यात एकूण बाराशे ठेकेदार असून त्यांच्याकडे हजारोच्या संख्येने कामगार असू शकतात त्या कामगारांची संख्या व माहिती प्रशासनाला उपलब्ध होण्यासाठी




संबंधित सर्व यंत्रणांनी तालुका व विभाग स्तरावर ठेकेदारांच्या बैठका घेऊन त्यांच्याकडून माहिती उपलब्ध करून घ्यावी. संबंधित कामगार आयुष्यमान भारत कार्ड, पोर्टेबल रेशन कार्ड, पीएम जीवन ज्योती बीम योजना व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आदी योजनांचा लाभ घेत आहेत का याची माहिती घ्यावी. जे कामगार योजनांचा लाभ घेत नाहीत अशा सर्व कामगारांना कामगार कल्याण मंडळाच्या संकेतस्थळावर नव्याने नोंदणी करून उपरोक्त योजनेचा लाभ देणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे सर्व शासकीय यंत्रणा व सर्व संबंधित ठेकेदार यांनी असंघटित क्षेत्रातील कामगाराप्रती सामाजिक बांधिलकी ठेवून त्यांची माहिती व्यवस्थितपणे एकत्रित करून प्रशासनाला सादर करावी. सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी तालुका व विभाग स्तरावरील बैठकामध्ये उपस्थित राहणाऱ्या ठेकेदार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना कामगारांची संख्या व त्यांची माहिती ही कामगारांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी असल्याचे सुचित करावे. त्यानंतरही जिल्ह्यातील जे ठेकेदार कामगारांची संख्या व माहिती देणार नाहीत अशा ठेकेदाराविरोधात सामाजिक सुरक्षा कायदा २००८ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे निर्देश ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी महसूल श्री नाटेकर यांनी सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा योजना कार्यालय जिल्हा परिषद यंत्रणा सोलापूर महापालिका सार्वजनिक बांधकाम विभाग नगरपालिका या सर्व यंत्रणांकडे जवळपास १२०० ठेकेदार यांची नोंद आहे व त्यांनी कळविलेली कामगारांची संख्या ३७६२ इतकी आहे. परंतु कामगार मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांची संख्या नगण्य असून सर्व यंत्रणांनी अत्यंत गतीने कामगारांची नोंदणी करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणीसाठी कामगारांना बांधकाम कामगार म्हणून ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र तसेच आधार कार्ड महत्त्वाचे असल्याची माहिती कामगार विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. गायकवाड यांनी दिली.

---

हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवून घेतला शिबिराचा लाभ

# माढा येथे खा.शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबिर संपन्न




**आमदार अभिजीत पाटील यांनी शरद पवार यांची दिल्लीत भेट घेऊन शुभेच्छा दिल्या**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांच्या ८५ वा वाढदिवस माढा शहर व तालुक्यात विविध सामाजिक कार्यक्रमाने तसेच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. देशाचे नेते शरदचंद्र पवार यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त माढा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन आमदार अभिजीत पाटील मित्र परिवार तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, माढा तालुका व शहर यांच्यावतीने करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले.

या शिबिरामध्ये १२१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर सर्व रोग निदान शिबिरात २५५ नागरिकांनी तसेच या संपूर्ण आरोग्य शिबिरामध्ये हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. या शिबिरामध्ये मोतीबिंदू ऑपरेशनसाठी ५४ नागरिकांचे ऑपरेशन मोफत केले जाणार असून

यामध्ये सहभाग घेतलेल्या नागरिकांना मोफत चष्मे वाटप, मोफत औषधे वाटप व तज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली.

**आमदार अभिजीत पाटील मित्रपरिवार व माढा शहर व तालुका राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन**

यावेळी ज्येष्ठ विलास बप्पा देशमुख, जिल्हा परिषद सदस्य भारतआबा शिंदे, ज्येष्ठ नेते दिलीपबापू देशमुख, धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, राजाभाऊ चवरे, आनंदअप्पा कानडे, शहाजीआण्णा साठे, नितीनबापू कापसे, युवा नेते सुरज देशमुख, अविनाश देशमुख, टेंभुर्णीचे सरपंच प्रमोद कुठे, महिला राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्षा सुवर्णाशिवपुरे, ड.रत्नप्रभा जगदाळे, डिव्हीपी बँकेचे चेअरमन भाऊसाहेब महाडिक, ऋषिकेश बोबडे, विठ्ठलवाडीचे सरपंच हनुमंत जाधव, वेताळवाडीचे उपसरपंच दयानंद जाधव, दत्ता पाटेकर, अच्युत उमटे, ऋषीकाका तांबिले, आबासाहेब साठे, जितूभाऊ जमदाडे तसेच ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.विलास मेमाणे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश खंडेकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर लवटे, डॉ.अंजली शेळके, नेत्र तपासणीचे डॉ.अमोल बांगर, चव्हाण मॅडम, तसेच रक्त तपासणीसाठी अक्षय ब्लड बँकचे सहकारी उपस्थित होते...

माढाचे आमदार अभिजीत पाटील यांनी शरद पवार यांची दिल्ली येथे भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# हिंदुवरील अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी कळंब येथे न्याय यात्रा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे : बांगलादेश येथे होणारे हिंदू वरील अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी कळंब येथे सकल हिंदू समाजाने जागतिक मानवाधिकार दिनाचे न्याय यात्रा काढली, यावेळी बांगलादेशात होणाऱ्या हिंदू वरील अत्याचाराकडे लक्ष वेधणारे फलक हाती घेत जोरदार घोषणाबाजी करण्यात येत होती. सकल हिंदू समाजाने बांगलादेशात होणाऱ्या हिंदू वरील अत्याचारांच्या

निषेधार्थ मानवी हक्क दिनाचे औचित्य साधून मंगळवारी न्याय यात्रा रॅलीचे आयोजन केले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून ही रॅली उपविभागीय अधिकारी कार्यालयावर




दाखल झाले बांगलादेशात सत्तंतरानंतर झालेल्या मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला आहे. यामध्ये हिंदू समाजाला लक्ष केले जात असून हिंदू धर्मीय नागरिकांवर अमानुष अत्याचार केले जात आहेत, हे अत्याचार तात्काळ थांबवावेत यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लक्ष घालावे अशी मागणी यावेळी उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत पंतप्रधानाकडे करण्यात आली. यावेळी बांगलादेश प्रकरणावर लक्ष केंद्रित करणारे विविध फलक हाती घेऊन जोरदार घोषणाबाजी केली जात होती. रॅली उपविभागीय अधिकारी कार्यालयात पोहचली त्यानंतर निवेदन देऊन सांगता करण्यात आली. यावेळी दिलेल्या निवेदनावर प्रकाश भडंगे, मकरंद पाटील, अनिल यादव,सतपाल बनसोडे, विश्वंभर पाटील, ड. शकुंतला फाटक, शितल चोंदे, दिलीप लोढा, विष्णू बारगुले, छत्रभुज भांडे, संदीप कोकाटे, शंभू कोकीळ, परशुराम देशपांडे, शिवराज पाटील धनेगावकर,अजित गुरव, महेश जोशी,संतोष भांडे, संजय जाधवर, किरण फल्ले, अशोक क्षीरसागर, नाना शिंगणापूरे,बंडू गंभीरे, सचिन शिरसागर, यांच्या साह्या आहेत.

# परभणी येथील संविधान अवमान प्रकरणाचा नळदुर्ग येथे रिपाइं (आठवले) च्यावतीने जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : परभणी येथे एका नराधमाने भारतीय संविधानाची उद्देशिका जाणिव पुर्वक फाडून संविधानाचा अवमान केला असून सदर प्रकार हा निंदनीय आहे.या निंदनीय घटनेचा नळदुर्ग ता.तुळजापूर येथे जाहीर निषेध करून संबंधित गुन्हेगारावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्यावतीने नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांच्या कडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



या बाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्यावतीने नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशभरात भारतीय संविधानाचे अमृता मोहत्सवी वर्षं साजरं करण्यात येत असून ठिकठिकाणी संविधान गौरव प्रित्यर्थ विविध कार्यक्रम आयोजित केले जात असताना परभणीत मात्र केवळ द्वेषभावनेतून परभणी येथील महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या शेजारी लावली संविधानाची उद्देशिका माथेफिरू नराधम सोपान दत्ताराव पवार यांनी भर रस्त्यावर फाडून संविधानाचा अवमान केला असून सदर घटनेचा रिपाइं (आठवले)च्या वतीने जाहीर निषेध करण्यात येत असून संबंधित गुन्हेगारांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा या संदर्भात तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

**संबंधित गुन्हेगारावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा रिपाइं (आठवले) ची मागणी**

यावेळी देण्यात आलेल्या लेखी निवेदनावर रिपाइं (आठवले) चे जिल्हा समन्वयक बाबासाहेब बनसोडे,एस.के. गायकवाड, अरूण लोखंडे, नळदुर्ग शहर अध्यक्ष मारूती खारवे, रिपाइं चे सुरेश लोंढे,राम लोंढे,उमेश गायकवाड, राजकुमार वाघमारे, अनिल वाघमारे,अजय दुपारगुडे, आदींच्या सह्या आहेत.

---

**धनगर समाजाला मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व मिळावे : ढेपले**

**मेळाव्यात मान्यवर पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती**

# निफाड येथील हॉटेल रुद्राय येथे धनगर समाजाचा मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड येथील हॉटेल रुद्राय येथे नुकतेच नाशिक जिल्ह्यातील धनगर समाजाचे मान्यवर पदाधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत कार्यकर्त्यांचा मेळावा धनगर समाजाचे जेष्ठ नेते.. नाशिक जिल्हा दुध संघाचे माजी चेअरमन व निफाड विविध कार्यकारी विकास सेवा संस्थेचे चेअरमन शिवाजीराव ढेपले यांच्या अध्यक्षतेखाली समाजाच्या विविध मागण्यांसाठी व धनगर समाजाला मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व मिळावे या मागणीसाठी घेण्यात आला.

मागील अडीच वर्षाच्या काळात धनगर समाजाला प्रतिनिधित्व नसल्यामुळे समाज नाराज असून आतापर्यंत नाशिक जिल्ह्यातील धनगर समाजाच्या वाट्याला कधीच विधानपरिषद आली नाही. याचा सर्व पक्षांनी विचार करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. असुन, महामंडळावर, शासकीय कमीट्यांवर नाशिक जिल्ह्यातील धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांची वर्णी लागावी.तसेच भविष्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत समाजाला तिकीटे मिळावी, धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी. समाजाला मेंढपाळ व्यवसायाच्या निमित्ताने भटकंती करावी लागु नये म्हणून मुक्त गोठ्यात लवकर वजनदार होणाऱ्या शेळी मेंढीच्या जाती विकसित कराव्या. पारंपरिक व्यवसायामुळे मुलाबाळांच्या शिक्षणाची हेळसांड असून त्यांना मोफत व दर्जेदार शिक्षण व व्यवसायासाठी बिनव्याजी कर्ज अशा अनेक प्रकारच्या मागण्या याप्रसंगी मेळाव्यात करण्यात आल्या.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत विविध पक्षाच्या वतीने धनगर समाजाचे सात आमदार निवडून आले. आ. दत्ता मामा भरणे, आ.गोपीचंद पडळकर, आ,ऊत्तमराव जानकर ,आ, नारायण आबा पाटील, शे.का.प.तर्फे बाबासाहेब देशमुख,आ. सचिन पाटील ,आ गजानन लवटे, या पैकी सत्ताधारी पक्षांकडुन तीन मंत्रीपदे व नाशिक जिल्हा शिवसेना अध्यक्ष भाऊलाल तांबडे यांना शिंदे शिवसेनेच्या कोठ्यातुन विधानपरिषद आमदार करावे अशी मागणीही या वेळी करण्यात आली., यासाठी नाशिक जिल्ह्यातील धनगर समाजाचे शिष्टमंडळ लवकरच मुख्यमंत्री व दोन्हीही ऊपमुख्यत्र्यांना भेटणार आहे. याप्रसंगी समाजनेते बापूसाहेब शिंदे,नवनाथ ढगे,सेवानिवृत्त डेप्युटी कलेक्टर देवीदास चौधरी,मनमाड मार्केट कमीटीचे चेअरमन गंगाधर बिडगर वकील,पुण्यश्लोक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब ओहोळ,सुरेश आगवणे,गोरख गाढे,सुरेश पल्हाळ,रामनाथ पल्हाळ, भाऊसाहेब सैंद्रे, मालेगाव पंचायत समितीचे सदस्य नंदुकाका शिरोळे, येवला मार्केट कमीटीचे ऊपसभापती गणपत कांदळकर,येवला पंचायत समितीचे माजी सदस्य बबनराव साळवे,अहिल्यादेवी शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष महेंद्र दुकळे,चांदवड मार्केट कमीटीचे संचालक विक्रम बाबा मार्कंड, येवला खरेदी विक्री संघाचे संचालक दत्तु देवरे,शांतीलाल सोनी पतसंस्थेचे संचालक भास्करराव ढेपले,निफाड खरेदी विक्री संघाचे संचालक भाऊसाहेब मोरे, विंचुर सोसायटी चे चेअरमन बापुसाहेब सोदक, माणिक देवकर, परसराम घोडे, राजाभाऊ घोडे, चारुदत्त आढाव,शरद ढेपले आदीसह अनेक मान्यवर,विविध संस्थांचे पदाधिकारी ऊपस्थित होते.



सुत्रसंचालन माणकेश्वर वाचनालयाचे संचालक सुनील चिखले यांनी केले. आभार प्रदर्शन रतन हिरे यांनी केले.